# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी २२६१७९६९ फॅक्स – २२६९०००७
E-mail : mcm.dte@gmail.com Internet : http://www.dte.org.in


संकेतस्थळ : परिपत्रक

का.क्र.१८/तंशिसं/अल्प.विभाग/२०१५/८७
दिनांकः- २३ एप्रिल २०१५

प्रति,
सर्व प्राचार्य / संचालक /अधिष्ठाता
पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी व तत्सम संस्था व
त्यामध्ये शिक्षण घेणारे अल्पसंख्यांक विद्यार्थी

**विषय :- केंद्र व राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजने बाबत....**

सर्व संस्था / अल्पसंख्यांक विदयार्थ्यांना कळविण्यात येते की,

- **केंद्र शासनाची गुणवत्ता - नि -साधन शिष्यवृत्ती (मेरीट - कम - मिन्स) योजना**
  (संकेत स्थळ: www.momascholarship.gov.in)

  व

- **राज्य शासनाची अल्पसंख्याक शिष्यवृत्ती योजना**
  (संकेत स्थळ: www.dtemaharashtra.gov.in/scholarships)

संबंधीत अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजनेच्या जाहिरातीनुसार विद्यार्थ्यांकडून संबंधीत सांकेतिक स्थळाव्दारे ऑनलाईन अर्ज मागवून संस्थेकडून ऑनलाईन तपासणी करुन मंजूर/नामंजूर करण्यात येते, त्याची तपशीलवार यादी संस्थेला (त्यांच्या लॉगिन आयडी व त्यांना देण्यात आलेल्या पासवर्ड व्दारे लॉगिन करुन) **Institute Panel** च्या अंतर्गत देण्यात येते व शिष्यवृत्ती मंजुर झालेल्या विद्यार्थ्यांची अंतिम यादी संस्थांना व विद्यार्थ्यांना संकेत स्थळाव्दारे उपलब्ध होते.

या कार्यालयाकडून एकदा शासननिर्णयाप्रमाणे अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती [ केंद्रशासनाची गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (**Merit-cum-Means**) / राज्यशासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती ] मंजूर झाल्यानंतर व शिष्यवृत्ती योजनेची रक्कम सरळ विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होत असल्याकारणाने कोणत्याही परिस्थितीत अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती रद्द करता येणार नाही.

जर विद्यार्थ्यांना इतर कोणतीही शासकीय शिष्यवृत्ती / सवलत मंजूर करण्यात आली असेल / करण्यात येईल (जसे ईबीसी / सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग कडून इ.) तर संस्थेने त्या विद्यार्थ्यांचे नाव त्या योजनेतुन रद्द करण्याबाबत संबंधीत कार्यालयास न चुकता कळविण्यात यावे, याची संबंधित संस्थेने नोंद घ्यावी.

**शासनाच्या धोरणानुसार विद्यार्थी एकाच शासकीय योजनेचा लाभ घेऊ शकतो, जर विद्यार्थी एका पेक्षा अधिक शासकीय योजनेचा लाभ घेत असेल तर त्या संबंधित संस्थेला जबाबदार धरण्यात येईल.**

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत :-१. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद यांना कळविण्यात

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तशिसं/प्राकाना/अल्पसं/२०१५/ 1288
दिनांक : 30 APR 2015

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व पदवी/पदविका व पदव्युत्तर पदवी संस्था
नागपूर विभाग, नागपूर.

यांना कळविण्यांत येते की, सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.